**Date: 05/03/2021**

**Subject: Assignment Submission of B.A.II,III/B.Com.II,III Students for internal Assessment.**

Dear B.A. Part II, III /B. Com Part II,III students,

This is to inform you that the course structure of B.A. II,III / B. Com II,III has been revised from the academic year 2019-20 for Centre for Distance Education. Each paper is of 100 marks, however as per the new structure, 100 Marks are divided into internal and external examination/assessment. The internal assessment is of 25 Marks and External Assessment is for 75 marks. For External assessment you will have to write examination for 75 marks at the end of the year at your respective examination centres, however for internal assessment you will have to write Assignments for 25 marks and submit online through Google classroom **App**. The questions for assignment are given at the end of each lessons/Course material provided by CDE.

**The Assignment for internal assessment of all the subject is to be submitted till 25th March 2021**

**Assessment weightage:**

a) Internal (25 marks) and external assessment (75 Marks) is compulsory for all the students.
b) Students have to secure the minimum passing marks in Internal and External Examination Separately. Minimum Passing standard for internal assessment is 9/25 and for External Examination is 26/75. Overall passing standard in any subject is 35%.
c) If any student could not submit the assignment on time or failed in internal assessment she will not be allowed to appear for External Examination and will be declared failed in the respective subject, as per the university rules.

**Instructions for writing Assignments:**

I. Assignment can be submitted in typed or in handwritten form. For typed format the word limit is 1000-1500 for 15 marks question and 600-800 words for 10 marks question. For handwritten matter 5-6 pages for 15 marks question and 2-3 pages for 10 marks question. All the matter should be upload the types assignment or upload the handwritten scanned Assignment..

II. Assignment should be written for individual paper i.e total 12 assignments for B.A. II/ B.Com II - Sem-III and IV and B.A. III/ B.Com III - Sem, V and VI separately to be submitted..

III. **Structure of assignment should consist of:**
- Cover page (as per the format enclosed in ***Annexure-A***)
- Index
- Introduction to the topic
- Main content
- critical analysis
- conclusion/summery
- references

IV. **Mode of submission:** final assignment should be submitted online through Google classroom before **25th March 2021**

V. **Caution for plagiarism and malpractices:** Students should not plagiarize any material. While using quotation or any matter/data from another source, the reference should be properly made at the end of the assignment or in footnotes. Students should not copy assignment of other students, otherwise it will be considered as malpractices, and hence action will be taken against students involved as per the university norms.

For any queries call on office landline:

**CDE OFFICE: 26608193 / 26608176**

Email : exam@cde.sndt.ac.in

**Dr. Smriti Bhosle**

Director

दिनांक: ०५/०३/२०२१

**विषय : कला व वाणिज्य** ( B.A II,III/B.Com II,III) **अंतर्गत मुल्यांकनाबाबत.**
**(Internal Assignment)**.

प्रिय विद्यार्थिनी,

शैक्षणिक वर्ष २०१९—२० पासून विद्यापीठाने कला व वाणिज्य (B.A.II,III /B.Com II,III) अभ्यासक्रमात केलेल्या नवीन बदलानुसार प्रत्येक विषयातील मुल्यांकन (Assesment), अंतर्गत व बाहय मुल्यांकन असे केले जाणार आहे. प्रत्येक विषय हा १०० गुणांचा असून, त्यापैकी अंतर्गत मुल्यांकनासाठी २५ गुण असून बाहय मुल्यांकनासाठी ७५ गुण आहेत. बाहय मुल्यांकन हे शैक्षणिक वर्षाच्या शेवटी म्हणजेच एप्रिल—मे मध्ये अंतिम परीक्षेच्या माध्यमातून केले जाते. तर अंतर्गत मुल्यांकनासाठी विद्यार्थिनीने स्वाध्याय (Assignment) तयार करून ते स्वाध्याय **गूगल वर्ग** (Google Classroom App) **माध्यमातून ऑनलाइन** करणे गरजेचे आहे. अंतर्गत मुल्यांकन २५ मार्कांसाठी असून त्यासाठी आवश्यक प्रश्नांची यादी प्रत्येक विषयाच्या अभ्याससाहित्याच्या (lesson/Course material) शेवटी दिलेली आहे. परिपूर्ण स्वाध्याय **२५ मार्च २०२१** पर्यत पाठवायचे आहेत.

**१. मुल्यांकनाचे स्वरूप:**

अ. अंतर्गत मुल्यांकन (२५गुण) आणि बाह्य मुल्यांकन (७५गुण) हे सर्व विद्यार्थिनींना अनिवार्य आहे.

ब. विद्यार्थिनीने अंतर्गत मुल्यांकना आणि बाह्य मुल्यांकनात स्वतंत्र पध्दतीने उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अंतर्गत मुल्यांकनात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ०९ गुण (०९/२५) आणि बाह्य मुल्यांकनात उत्तीर्ण होण्यासाठी किमान २६ गुण(२६/७५गुण) मिळणे गरजेचे आहे. प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ३५ टक्के गुण मिळणे आवश्यक आहे.

ड. अंतर्गत मुल्यांकनासाठीचे स्वाध्याय निर्धारीत वेळेत जमा न करणाऱ्या तसेच अंतर्गत मुल्यांकनात नापास झालेल्या विद्यार्थिनींस एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या नियमानुसार बाहय मुल्यांकनाच्या परीक्षेस (External Exam) बसता येणार नाही.

**२. स्वाध्यास लिहिण्यासाठी सुचना:**

अ. स्वाध्याय टंकलिखित (Typed) किंवा हस्तलिखित स्वरूपात सादर करता येतील. टंकलिखित स्वरूपातील स्वाध्यायात १५ गुणांच्या प्रश्नांसाठी १००० ते १५०० शब्दमर्यादा, १० गुणांच्या प्रश्नांसाठी ६०० ते ८००शब्दमर्यादा आहे. हस्तलिखित स्वरूपातील स्वाध्यायात १५ गुणांसाठी ५ ते ६ पृष्ठे आणि १० गुणांसाठी २ ते ३ पृष्ठे आवश्यक आहे. स्वाध्यायाचे लिखाण हे पाठपोट एक पृष्ठांवर (Back to Back) करणे आवश्यक आहे.

ब. अंतर्गत मुल्यांकनसाठी प्रत्येक विषयाचे स्वतंत्र स्वाध्याय (Assesment), लिहिणे आवश्यक आहे. B.A. II/ B.Com II **साठी** सत्र ३, ४ आणि B.A. III/ B.Com III **साठी** सत्र ५,६ यांचे एकूण १२ स्वाध्याय (Assessments ) जमा करणे अनिवार्य आहे.

३. **स्वाध्यायाची रचना पुढीलप्रमाणे:**

- मुखपृष्ठ (पुरविलेल्या नमुन्याप्रमाणे असावे. **नमुना 'अ'** सोबत जोडला आहे.)
- अनुक्रमणिका
- विषयाची प्रस्तावना
- मुख्य विषय ( विषयाचा गाभा )
- टीकात्मक परीक्षण
- सारांश/समारोप
- संदर्भग्रंथ

४. **सादरीकरणाची पध्दती** : परिपूर्ण स्वाध्याय विद्यार्थिनीनी **२५ मार्च २०२१** पर्यत **गूगल वर्ग** (Google classroom App) **माध्यमातून ऑनलाइन** करणे **आवश्यक** आहे. निर्धारीत दिनांकानंतर सादर होणाऱ्या स्वाध्यायांचा स्विकार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. **वाङमयचौर्य व गैरप्रकारास** (Malpratcices) **प्रतिबंध:** विद्यार्थिनींना सूचित करण्यात येते की, कोणत्याही पध्दतीने साहित्याची नक्कल करू नये. विशिष्ट साहित्यातील काही भाग आपल्या लिखाणात वापरल्यास योग्य त्या जागी संदर्भ नमूद करावेत, संदर्भाच्या नोंदी त्या मजकूराच्या शेवटी किंवा स्वाध्यायाच्या शेवटी कराव्यात. विद्यार्थिनींना विनंती करण्यात येते की इतर विद्यार्थिनींनी लिहिलेल्या स्वाध्यायातील मजकूराची नक्कल करु नये, अन्यथा नक्कल करण्यात सहभागी सर्व विद्यार्थिनींवर विद्यापीठाच्या नियमांतर्गत कार्यवाही केली जाईल.

कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी खालील दूरध्वनी क्रमांक, ई—मेल किंवा पत्त्यावर सपर्क साधावा.

संपर्कासाठी पत्ता:— दूरस्थ शिक्षण विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,
सर विठठलदास विद्याविहार, जुहू रोड,
सांताकूझ ( पश्चिम )मुंबई—४०००४९.
दूरध्वनीक्रमांक:— .०२६६०८१७६/०२२२६६०८१९३

ई—मेल exam@cde.sndt.ac.in

धन्यवाद.

**Dr. Smriti Bhosle**
Director